

परंडा : येथे किराणा कीटचे वाटप करताना राहुल बनसोडे आदी.

## ढगपिंपरी, भोत्रा, परंडा येथे किराणा कीटचे वाटप

परंडा/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दिलीप वळसे-पाटील व माजी खासदार शिवाजीराव पाटील यांच्या वतीने व माजी आ. राहुल मोटे व तहसिलदार निलेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक राहुल बनसोडे यांच्या हस्ते शहर व तालुक्यातील अतिवृष्टीमुळे कामे ठप्प झाल्याने किराणा कीटचे ढगपिंपरी, भोत्रा, शहरातील अण्णाभाऊ साठे नगर या ठिकाणी वाटप करण्यात आले.

यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बिभिषण खुणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अतूल गोफणे, राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेल जिल्हा उपाध्यक्ष घनश्याम शिंदे, विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे संचालक सचिन शिंदे, नितीन ओहाळ, रुपेश बनसोडे, ऋषिकेश बुरुंगे, शमा शेख, मंजुषा सुरवसे, मोहिनी शिंदे आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त



### शुभांगी भोसले

**सोलापूर :** बाळीवेस, वडार गल्ली येथील रहिवाशी शुभांगी प्रमोद भोसले यांचे अल्पशा आजाराने सोमवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, सासू, दीर, नणंद असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पुणे नाका येथील स्मशानभूमीत मंगळवारी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.



### वत्सला पुराणिक

**मोहोळ :** येथील आदर्श चौकातील वत्सला सिद्धलिंग पुराणिक (वय ८५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मोहोळ येथील संगीत विशारद उमेश पुराणीक यांच्या त्या मातोश्री होत.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी पॅटर्नवर आधारित महसूल विभागाची नवी कार्यपद्धती राज्यात लागू

सोलापूर/प्रतिनिधी



### राज्य शासनाचा गौरवपूर्ण निर्णय

महसूल व वन विभागाने १० ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य शासनाचा आदेश प्रसिद्ध करून छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी तयार केलेली ही यंत्रणा आदर्श मानून संपूर्ण महाराष्ट्रातील महसूल प्रशासनात लागू करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि कार्यक्षम नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या प्रशासकीय नवकल्पनांना आता राज्य शासनाने राज्यस्तरावर स्वीकार केला आहे. महसूल विभागाच्या कामकाजातील पारदर्शकता, समन्वय आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी राज्य शासनाने जिल्हाधिकारी स्वामी यांचे १५ मे २०२५ रोजी जारी केलेल्या आदेशाचे शासन निर्णयात रूपांतर केले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी पॅटर्नवर आधारित महसूल विभागाची नवी कार्यपद्धती राज्यात लागू करण्यात आली आहे.

१५ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी स्वामी यांनी महसूल प्रशासनातील विविध पातळ्यांवरील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय वाढविण्यासाठी, जबाबदाऱ्यांचे स्पष्ट विभाजन करण्यासाठी आणि कामकाज अधिक शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी एक सुसंगत कार्यप्रणाली तयार केली होती.

या निर्णयामुळे तालुका व मंडळ स्तरावरील फाइल व्यवहार, नोंदणी, नागरिक सेवा आणि शासकीय योजना यामध्ये कार्यक्षमता व पारदर्शकता वाढली.

या उपक्रमामुळे महसूल विभागातील कामकाजाचा वेग वाढला, फाइल अडकण्याचे प्रमाण कमी झाले आणि नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद मिळू लागला. जिल्ह्यातील प्रशासन अधिक नागरिकाभिमुख बनविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे राज्यभर कौतुक होत आहे.

## सरकारी कामातील अडथळा प्रकरणी माजी नगरसेवक निर्दोष


सोलापूर/प्रतिनिधी

फौजदाराशी झोंबाझोंबी करून सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपातून माजी नगरसेवक नागेश लक्ष्मण ताकमोगे (रा. सोलापूर) यांची सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. हा निकाल अति. सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दिला.

घटनेनुसार, २८ जून २०१६ रोजी फौजदार विश्वास भांबड हे शहर वाहतूक विभागात कर्तव्यावर असताना बालाजी सरोवर परिसरात नंबर प्लेट नसलेली काळ्या रंगाची ऑडी गाडी अडवली. वाहनचालकाकडे कागदपत्रे नसल्याने त्यांनी दंडात्मक कारवाई केली. त्यावेळी नगरसेवक ताकमोगे यांनी फौजदाराशी वाद घालून झोंबाझोंबी केल्याची फिर्याद विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल झाली होती.

तपासानंतर पोलिसांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने आरोपीस शिक्षा मागितली, तर बचाव पक्षाने साक्षींमध्ये विसंगती, सीसीटीव्ही पुरावा नसणे यावर भर दिला. न्यायालयाने साक्षी व पुरावे अपुरे असल्याचे नमूद करत ताकमोगे यांना निर्दोष मुक्त केले.

या प्रकरणी बचाव पक्षात ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. पी. बी. लोंढे पाटील, ॲड. अभिषेक गुंड, ॲड. प्रसाद अग्निहोत्री व ॲड. आदित्य आदोने यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड. दत्ता पवार यांनी काम पाहिले.



## परमेश्वर माळगे मित्र परिवारातर्फे ३२४ जणांचे रक्तदान

सोलापूर/प्रतिनिधी

परमेश्वर माळगे मित्र परिवारातर्फे ३२४ जणांनी रक्तदान केले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून परमेश्वर माळगे मित्र परिवाराने रक्तदानाने वाढदिवस साजरा केला.

जुळे सोलापूरातील बालाजी मंगल कार्यालयात हे रक्तदान शिबीर झाले. याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, युवा नेते मनीष देशमुख, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी नगरसेवक अविनाश पाटील आदी मान्यवरांनी भेट देऊन शिबिराचे कौतुक केले. कार्यक्रमात अनेक स्वयंसेवक, तरुण आणि महिला कार्यकर्त्यांनीही उत्साहाने भाग घेतला.

## सोलापूर महापालिका निवडणूक राष्ट्रवादी पूर्ण ताकदीने लढणार : कृषिमंत्री भरणे


### पुणे येथे पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार आहे. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना आता कामाला लागावे, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

सोलापूर शहरातील राष्ट्रवादी पदाधिकारी व सदस्यांची पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत बैठक आयोजित केली होती त्यावेळी ते बोलत होते.

या आढावा बैठकीत त्यांनी शहराची भौगोलिक परिस्थिती, महानगरपालिकेतील सदस्य संख्या, तसेच मागील निवडणुकीतील सर्वपक्षीय सदस्य संख्या यांची माहिती घेऊन पक्षातील सर्व पदाधिकारी फ्रंटल सेलचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला कशाप्रकारे निवडणुकीच्या सामोरे जावे लागेल, या संदर्भात भरणे यांनी मार्गदर्शन केले.



सोलापूर महापालिका निवडणुकीबाबत चर्चा करताना दत्तात्रय भरणे. सोबत आनंद चंदनशिवे, किसन जाधव, संतोष पवार आदी.

याप्रसंगी सर्व पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध ठिकाणी राष्ट्रवादी संदर्भात असलेली माहिती तसेच जुने व नवीन कार्यकर्ते पदाधिकारी त्याचबरोबर नव्याने प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्याबद्दल तसेच जुने व नवीन यांचा योग्य समन्वय साधून महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे, तौफिक शेख यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनानुसार महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते त्याचबरोबर येणाऱ्या काळात राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व इच्छुक पदाधिकारी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ताकतीने महानगरपालिकेत जास्तीत जास्त सदस्य निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निश्चय केला.

